# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः28.10.2024** **वारःसोमवार**

---

1. वडोदरा इथ उभारलेल्या देशातील खाजगी क्षेत्रातील पहिल्या एरोस्पेस प्रकल्पाचं उद्घाटन आज पंतप्रधानांच्या हस्ते होणार
2. स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर
3. भ्रष्टाचारमुक्त समाज निर्मितीसाठी देशव्यापी दक्षता जनजागृती सप्ताहाचं आयोजन
4. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी विविध पक्षांकडून कालही उमेदवारी याद्या जाहीर आणि
5. महिला क्रिकेटमध्ये मर्यादित षटकांच्या दुसऱ्या सामन्यात न्यूझीलंडकडून भारताचा पराभव

**पंतप्रधान-गुजरात**

गुजरातमधल्या वडोदरा इथं C-295 लष्करी विमानांच्या निर्मितीसाठी तयार करण्यात आलेल्या टाटा एअरक्राफ्ट संकुलाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांच्या हस्ते आज होणार आहे. भारत आणि स्पेनमधील धोरणात्मक संरक्षण संबंध वाढवणारा टाटा एअरबस प्रकल्प हा मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत लष्करी विमानांसाठीचा भारतातील पहिला खाजगी क्षेत्रातील एरोस्पेस प्रकल्प आहे. या केंद्रात टाटा व्यतिरिक्त, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड आणि भारत डायनॅमिक्स लिमिटेड या आस्थापना आणि खाजगी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचं देखील योगदान असेल.

**रेल्वे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज गुजरातमधील अमरेली इथं दूरस्थ माध्यमातून भुज-नलिया रेल्वेमार्गाच्या कामाचं राष्ट्रार्पण करण्यात येणार आहे. सुमारे एक हजार 100 कोटी रुपये खर्चून करण्यात आलेल्या या मार्गाची लांबी 101 किलोमीटर आहे. या प्रकल्पामुळे गुजरातमधील कच्छ भागात स्वस्त वाहतूक आणि आर्थिक चलनवलंन वाढण्यास मदत होणार असल्याचं पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी आकाशवाणीला सांगितलं. या विस्तृत प्रकल्पात 24 मोठे पूल, 254 छोटे पूल, 3 उड्डाणपूल आणि 30 भूमिगत पूल बांधण्यात आले आहेत, असं आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

**स्पेन पंतप्रधान-भारत दौरा**

स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ काल रात्री तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. त्यांचा हा पहिलाच भारत दौरा असून अठरा वर्षानंतर स्पेनच्या पंतप्रधानांचा भारत दौरा होत आहे. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी स्पेनच्या पंतप्रधानांबरोबर शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा करतील. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर हे देखील स्पेनच्या पंतप्रधानांशी चर्चा करणार आहेत. पंतप्रधान सांचेझ मुंबईलाही भेट देणार असून तिथं ते व्यापार, उद्योग, विचारवंत आणि चित्रपट उद्योगातील प्रमुखांशी संवाद साधतील. या भेटीदरम्यान अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्षरी होण्याची अपेक्षा असून त्यामुळे द्विपक्षीय सहकार्याला चालना मिळेल, असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**मन की बात**

आजच्या जागतिक अँनिमेशन दिनाच्या पार्श्वभूमीवर, देशाला ॲनिमेशनचं जागतिक केंद्र बनवण्याचा संकल्प करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून ते देशवासीयांशी संवाद साधत होते. या कार्यक्रमाचा हा 115 वा भाग होता. या भागात 'डिजिटल सुरक्षा' या महत्त्वाच्या विषयावर पंतप्रधानांनी विस्तारानं चर्चा केली. कोणत्याही कायद्यात डिजीटल अटकेची तरतूद नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. डिजिटल सुरक्षेबाबत प्रत्येक नागरिकानं जागरुक राहण्याची आवश्यकता असल्याचं मोदी म्हणाले.

**जयशंकर-मुंबई**

महाराष्ट्र राज्य भौगोलिकदृष्ट्या गुंतवणुकीला योग्य असल्याची जागतिक उद्योगांची भावना असल्यानं, विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीमध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा असल्याचे गौरवोद्गार परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी काल मुंबईत काढले. मुंबई भाजपा कार्यालयात त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. केंद्र सरकारच्या तिसऱ्या पर्वात विकसित महाराष्ट्राच्या संकल्पपूर्तीसाठी समर्पितपणे आणि वेगवान काम सुरू असून त्यासाठी महाराष्ट्राचा विकास वेगाने व्हायला हवा, असंही ते म्हणाले. जागतिक उद्योगक्षेत्र भारतात गुंतवणुकीसाठी उत्सुक

असून भारताविषयी जागतिक स्तरावर विश्वास वाढत असल्याचं हे निदर्शक आहे. जेव्हा राज्य सरकार, केंद्र सरकार एकत्र काम करतात, तेथे उद्योगांची सहाजिकच पहिली पसंती असते, असंही जयशंकर यावेळी म्हणाले.

**दक्षता-जनजागृती सप्ताह**

भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त देशभर साजरा करण्यात येणाऱ्या दक्षता जनजागृती सप्ताहाला आज पासून सुरुवात होणार आहे. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणानं काम करून भ्रष्टाचारमुक्त समाज निर्माण करण्याच्या उद्देशानं हा सप्ताह साजरा केला जातो. राष्ट्राच्या समृद्धीसाठी प्रमाणिकपणाची संस्कृती ही यंदाच्या दक्षता जनजागृती सप्ताहाची मध्यवर्ती संकल्पना आहे. या सप्ताहादरम्यान, भ्रष्टाचाराच्या विरोधात जनजागृती करण्यासाठी अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार आहे. मंत्रालय, सार्वजनिक क्षेत्र, बँका आणि विविध शासकीय विभागातील कर्मचारी शपथ घेऊन हा सप्ताह साजरा करतील.

**उमेदवारी अर्ज**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या अखेरचा दिवस आहे; त्यामुळे कालही विविध राजकीय पक्षांकडून उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली.

**राष्ट्रवादी-तिसरी यादी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं येत्या निवडणुकीसाठी नऊ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. यामध्ये मोहोळमध्ये सिद्धी कदम, परळीत राजेसाहेब देशमुख, चिंचवडमध्ये राहुल कलाटे, भोसरीत अजित गव्हाणे, करंजा विधानसभेसाठी ज्ञायक पटणी, हिंगणघाटमध्ये अतुल वांदिले, हिंगणामध्ये रमेश बंग, अणुशक्तीनगरमध्ये फहाद अहमद, माझलगाव इथं मोहन जगताप आदींना उमेदवारी देण्यात आली आहे.

**उमेदवारी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं काल उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली. यात गेवराईतून विजयसिंह पंडीत, फलटणला सचिन पाटील, निफाडमधून दिलीपकाका बनकर तर पारनेरमधून काशिनाथ दाते यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

शिवसेनेनंही काल 20 उमेदवारांची पुढची यादी जाहीर केली. यामध्ये वरळीमधून मिलिंद देवरा, पुरंदरमधून विजय शिवतारे, कुडाळमधून निलेश राणे, कोल्हापूर उत्तरमधून राजेश क्षीरसागर आणि दिंडोशीमधून संजय निरुपम यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

कॉंग्रेसतर्फे काल 14 उमेदवारांची पुढची यादी जाहीर करण्यात आली, यात पुणे कॅटॉनमेंटमधून रमेश बागवे, शिवाजीनगरमधून दत्तात्रय बहिरट तर पंढरपूरमधून भगीरथ भालके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अंधेरी पश्चिममधून या आधीच्या यादीत सचिन सावंत यांना उमेदवारी दिली होती. परंतु आता या जागेवर अशोक जाधव यांना कॉंग्रेसनं उमेदवारी दिली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे काल 32 उमेदवारांची घोषणा करण्यात आली, आंबेगावमधून सुनील इंदोरे, नाशिक पूर्व मधून प्रसाद सानप यांना रिंगणात उतरवण्यात आलं आहे.

**दिवाळी**

देशभरात दीपावलीच्या मंगलपर्वाला आज, गुरूद्वादशी म्हणजेच वसुबारसेपासून प्रारंभ होत आहे. आज, गायवासराची पूजा करून दिवाळीची सुरुवात होईल. येत्या रविवारपर्यंत चालणाऱ्या या प्रकाशोत्सवानिमित्त महाराष्ट्रात सर्वत्र चैतन्याचं वातावरण आहे. मनोवेधक रोषणाईनं बाजारपेठा सजल्या आहेत. आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या या बरोबरच कपडे, दागिने खरेदीसाठी लोकांची लगबग दिसून येत आहे.

**पश्चिम रेल्वे**

दिवाळी सणासुदीच्या काळात होणाऱ्या प्रवाशांची संभाव्य गर्दी लक्षात घेत मध्य आणि पश्चिम रेल्वेनं प्रवाशांच्या सोयीसाठी मुंबई विभागातील निवडक प्रमुख स्थानकांवर फलाट तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरते निर्बंध लादले आहेत. प्लॅटफॉर्मवरील गर्दीचं व्यवस्थापन करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं पश्चिम रेल्वेच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी निवेदनात म्हटलं आहे. फलाट तिकिटांच्या विक्रीवरील हे निर्बंध 8 नोव्हेंबर पर्यंत लागू आहेत.

**डिस्लेक्सिया-जागरूकता**

आंतरराष्ट्रीय डिस्लेक्सिया जागरूकता महिन्यानिमित्त डिस्लेक्सियाबद्दल जागरूकता व्हावी यासाठी राष्ट्रपती भवन, संसद, इंडिया गेट आणि इतर सरकारी कार्यालयांमध्ये लाल दिवे लावण्यात आले आहेत. दरवर्षी ऑक्टोबरमध्ये डिस्लेक्सिया जागरूकता मोहिमेनिमित्त जागरुकता

वाढवणे आणि डिस्लेक्सिया आजाराबद्दल असलेल्या भेदभावासारख्या चुकीच्या समजुती दूर करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. जागरुकतेचा संदेश देण्यासाठी विजय चौक ते इंडिया गेटपर्यंत फेरीचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>जपान निवडणूक</u>**

जपानमध्ये रविवारी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत सत्ताधारी पक्षाच्या झालेल्या दारुण पराभवामुळे पुढील सरकार स्थापन होण्याबाबत आणि जगातील चौथ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्था असलेल्या देशाच्या दृष्टीकोनाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. युद्धोत्तर इतिहासात जपानमध्ये जवळपास संपूर्ण काळ सत्ता गाजवणाऱ्या पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्या लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी (एलडीपी) आणि त्यांचे कनिष्ठ आघाडीतील भागीदार कोमेइटो यांनी संसदेच्या कनिष्ठ सभागृहात 209 जागा जिंकल्या आहेत, अशी माहिती जपानमधील सार्वजनिक प्रसारक एनएचकेने दिली आहे.

**<u>इस्रायल- इराण</u>**

इराणला युद्ध नको आहे, मात्र इस्रायलच्या हल्ल्यांना इराण 'योग्य' प्रतिसाद देईल असं मत इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी व्यक्त केलं. आज इराणनं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची बैठक बोलावली आहे. इराण-इस्रायलमधल्या या संघर्षामुळं मध्य पूर्वेतील प्रादेशिक स्तरावर युद्ध होऊ शकतं अशी भीती अमेरिकेनं व्यक्त केली आहे. दरम्यान गेल्या दोन दिवसात इस्रायलनं केलेल्या हल्ल्यांमुळं इराणच्या संरक्षण क्षमतेला मोठा फटका बसला आहे, असं इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी काल एका भाषणात सांगितलं.

**<u>दिल्ली-हवा प्रदूषण</u>**

दिल्ली-एनसीआरमधील हवेची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट श्रेणीत आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं दिलेल्या माहितीनुसार, काल रात्री आठ वाजता दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक 347 इतका नोंदवला गेला. बुधवारपर्यंत हवेची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट श्रेणीतच राहण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागानं वर्तवली आहे.

**<u>जम्मू-काश्मीर-अटक</u>**

जम्मू आणि काश्मीर मधल्या, उत्तर काश्मीरच्या हंदवाडा इथं पोलिसांनी एका दहशतवाद्याच्या एका साथीदाराला अटक केली असून त्याच्या ताब्यातून शस्त्रास्त्र आणि दारूगोळा जप्त केला आहे. जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी लष्कराच्या राष्ट्रीय रायफल्स आणि सीआरपीएफच्या मदतीनं ही कारवाई केली.

**<u>महिला-क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये अहमदाबाद इथं काल झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडनं भारताचा 76 धावांनी पराभव केला.प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडनं निर्धारित 50 षटकांत 9 बाद 259 धावा केल्या.तर हे आव्हान गाठताना भारतीय संघ 48 व्या षटकांत 183 धावांवर सर्वबाद झाला.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार